# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

- **सफाई कर्मचाऱ्यांच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेत महाराष्ट्र राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) मा. श्री. शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक**

दिनांक 26 जून 2025 रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका मुख्यालयात, सफाई कामगारांच्या समस्यांचा आढावा घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य सफाई कामगार आयोगाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) मा. श्री. शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीचा उद्देश महापालिकेच्या अंतर्गत कार्यरत सफाई कर्मचाऱ्यांना उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध सोयी-सुविधांचा आढावा घेणे हा होता. या बैठकीस महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त डॉ. संभाजी पानपट्टे, प्र.अतिरिक्त आयुक्त डॉ. सचिन बांगर, उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, उपायुक्त (महिला व बालकल्याण) कविता बोरकर, शहर अभियंता दिपक खांबित, महापालिकेचे विविध विभागप्रमुख ,अधिकारी तसेच विविध सफाई कामगार संघटना देखील उपस्थित होत्या.

या बैठकीत मा. अध्यक्ष राज्य सफाई कामगार आयोग यांनी महानगरपालिका प्रशासन आणि विविध सफाई कामगार संघटनांशी संवाद साधला. सफाई कर्मचाऱ्यांसाठी महापालिकेच्या वतीने उपलब्ध असलेल्या योजनांची अंमलबजावणी, त्यामधील अडचणी आणि गरजांनुसार आवश्यक सुधारणा यावर सखोल चर्चा झाली. कामगार प्रतिनिधी म्हणून विविध मान्यवर संघटनांचे प्रतिनिधी देखील बैठकीत सहभागी झाले होते. यामध्ये श्रमजिवी कामगार रयत संघटना प्रतिनिधी सुलतान पटेल, भारतीय कामगार सेना प्रतिनिधी सुनील कळेकर, श्रमिक जनरल कामगार संघटना प्रतिनिधी श्रीकांत पराडकर, झुंज कामगार संघटना प्रतिनिधी भरत सोनारे, महाराष्ट्र नवनिर्माण महानगरपालिका कामगार कर्मचारी सेना प्रतिनिधी अभिनंद चव्हाण, अखिल भारतीय कामगार कर्मचारी संघ प्रतिनिधी विजय चव्हाण उपस्थित होते.

बैठकीत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या उपाययोजना, सुधारित आश्वासित सेवांतर्गत प्रगती योजना, लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार नियुक्ती प्रक्रिया, अनुसूचित जाती व जमाती प्रवर्गातील रिक्त पदांची भरती, स्थायी व ठेका सफाई कामगारांना वैद्यकीय विमा सुविधा, तसेच कोव्हिड-19 च्या काळात मयत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबांना सानुग्रह मदतीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत मा. अध्यक्ष श्री. शेरसिंग रुक्कानसिंग डागोर यांनी सफाई कामगारांच्या सुरक्षितता, आरोग्य सुविधा आणि सामाजिक सन्मान यासंबंधी महत्त्वाचे निर्देश दिले. तसेच, महापालिकेच्या माध्यमातून या कामगारांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्याच्या दृष्टीने प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, असे आवाहन त्यांनी केले. तसेच, प्रशासनाला सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्याचे निर्देश दिले आणि भविष्यातील धोरणे कामगार हित लक्षात घेऊन आखावीत, असे सूचित केले.